# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद

## शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) परीक्षा २०२५

## प्रसिध्दीपत्रक (प्रेसनोट)

महाराष्ट्र शासनाच्या पत्र क्रमांक संकीर्ण २०२५/प्र.क्र.९२/टिएनटी-१, दि.२८/०२/२०२५ व मा. आयुक्त (शिक्षण), यांचे जा.क्र. आस्था-क/प्राथ १०६/टेट-३/वेप/२०२५/११९१, दि.१९/०३/२०२५ रोजीच्या पत्रान्वये तसेच सदर परीक्षा शासन निर्णय सामान्य प्रशासन प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दिनांक २१ नोव्हेंबर २०२२ नुसार शासनाने नेमलेल्या IBPS या संस्थेमार्फत **"शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) परीक्षा २०२५"** चे आयोजन ऑनलाईन पध्दतीने **दिनांक २७/०५/२०२५ ते ३०/०५/२०२५ व दिनांक ०२/०६/२०२५ ते ०५/०६/२०२५** या कालावधीत राज्यातील **२६** जिल्हांमध्ये एकूण **६०** परीक्षा केंद्रांवर महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने ८ दिवसामध्ये प्रतिदिन तीन सत्रात करण्यात आले होते. सदर परीक्षेस एकूण **२२८८०८** परीक्षार्थी / उमेदवारांनी नोंदणी केली होती त्यापैकी परीक्षेस एकूण **२११३०८** प्रविष्ठ झाले होते.

शासन शुध्दीपत्रक क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१०६/टिएनटि-१, **दिनांक ०२/०५/२०२५** अन्वये "उमेदवारांनी व्यावसायिक अर्हता त्याचवेळीच्या संधीत उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक वा अन्य वैध प्रमाणपत्र महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे सदर व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकापासून कमाल १ महिना कालावधीत सादर करणे अनिवार्य आहे. विहित मुदतीत गुणपत्रक वा अन्य वैध प्रमाणपत्र उमेदवाराने सादर केल्यानंतर त्यांनी प्राप्त केलेल्या गुणांनुसार त्यांचे गुणपत्रक (SCORE CARD) देण्यात येईल."

दि. १७/०८/२०२५ रोजीच्या प्रसिध्दी निवेदनाच्या अनुषंगाने बी.एड. परीक्षेचे **१५७५६** प्रविष्ठ (Appear) व डी.एल.एड. परीक्षेचे **१३४२** प्रविष्ठ (Appear) असे एकूण **१७०९८** विदयार्थी/उमेद्वारांनी प्रविष्ठ (Appear) म्हणून ऑनलाईन आवेदनपत्र भरले होते. तरी दि. १४/०८/२०२५ अखेर बी.एड. परीक्षेचे **९९५१** व डी.एल.एड. परीक्षेचे **८२७** असे एकूण **१०७७८** प्रविष्ठ (Appear) विद्यार्थ्यांचा / उमेद्वारांचा निकाल प्रसिध्द करण्यात येत आहे.

तथापि ज्या विदयार्थी/उमेदवारांनी व्यावसायिक अर्हता त्याचवेळीच्या संधीत उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक वा अन्य वैध प्रमाणपत्र व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकापासून कमाल १ महिना कालावधीत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे या कार्यालयास अद्यापपर्यंत सादर केलेले नाही अशा उर्वरित बी.एड. परीक्षेचे **५८०५** व डी.एल.एड. परीक्षेचे **५१५** अशा एकूण **६३२०** प्रविष्ठ (Appear) विद्यार्थ्यांचा/उमेद्वारांचा निकाल राखीव ठेवण्यात येत आहे.

सदर परीक्षेचा निकाल आज **दि.१८/०८/२०२५** रोजी प्रसिध्द करण्यात आला असून सदर परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या उमेदवारांची गुणयादी व गुणपत्रक (SCORE LIST & SCORE CARD) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या **www.mscepune.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहे, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी उमेदवारांनी त्यांचे गुणपत्रक (SCORE CARD) **दि. ३१/०८/२०२५** पर्यंत डाऊनलोड करुन घ्यावे. उमेदवारांनी विहित मुदतीत त्यांचे गुणपत्रक (SCORE CARD) डाऊनलोड करून न घेतल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहिल. त्यानंतर याबाबतीत आलेल्या कोणत्याही प्रकारच्या विनंतीचा विचार केला जाणार नाही.

ठिकाण : पुणे
दिनांक : १८/०८/२०२५

**(अनुराधा ओक)**
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे - ०४**